# Frequently Asked Questions (तुमच्या संभाव्य प्रश्नांची उत्तरे)

**आपल्या शंका / अडचणींबाबत विद्यापीठाशी संपर्क साधण्याअगोदर आपण संभाव्य प्रश्नांची उत्तरे वाचावीत. आपल्या अनेक शंकांचे निरसन त्याद्वारे होऊ शकेल.**

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाविषयी थोडक्यात माहिती सांगा. | • श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ हे भारतातीलच नव्हे तर संपूर्ण दक्षिण-पूर्व आशियातील पहिले महिला विद्यापीठ असून या विद्यापीठाची स्थापना भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी सन १९१६ साली केली.<br>• श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ हे युजीसी मान्यताप्राप्त राज्य विद्यापीठ असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा- २०१६ नुसार कार्यरत आहे. |
| २ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण केंद्राविषयी थोडक्यात माहिती सांगा. | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचेच एक केंद्र म्हणून पारंपारिक शिक्षण पद्धतीबरोबरच १९७९ नंतर 'दूरस्थ शिक्षण केंद्र' म्हणून उच्च शिक्षणाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. दूरस्थ शिक्षण केंद्र हे विविध विषयातील व विद्याशांखातील प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यार्थिनींना उपलब्ध करून देते. मागील ०४ दशकांमध्ये लाखो विद्यार्थिनींनी या ' दूर व मुक्त' अध्ययन पद्धतीचा लाभ घेतला आहे. |
| ३ | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम युजीसी (UGC) मान्यताप्राप्त आहेत का? तसेच नियमित अभ्यासक्रमांसोबत त्यांची समकक्षता आहे का ? | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम युजीसी (UGC) मान्यताप्राप्त आहेत तसेच सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची नियमित अभ्यासक्रमांसोबत समकक्षता आहे. पदवी समकक्षतेबाबतचे परिपत्रक युजीसी आणि श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ४ | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अंतर्गत कोणकोणते अभ्यासक्रम चालविले जातात ? | • बी.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास)<br>• एम .ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास)<br>• बी.कॉम.<br>• एम.कॉम.<br>• पदव्युत्तर पदविका : (PGDHRM and PGDECE)<br>• प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Guidance and Counseling and Basics of Diet Therapy) |
| ५ | दूरस्थ शिक्षण केंद्राच्या पदवी अभ्यासक्रमांचा किमान आणि कमाल कालावधी किती आहे? | • दूरस्थ शिक्षण केंद्राच्या पदवी (बी.ए. / बी.कॉम.) अभ्यासक्रमासाठी किमान कालावधी हा तीन (०३) वर्षाचा असून अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीचा कमाल कालावधी हा सहा (०६) वर्षाचा आहे. |
| ६ | दूरस्थ शिक्षण केंद्राच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा किमान आणि कमाल कालावधी किती आहे? | • दूरस्थ शिक्षण केंद्राच्या पदव्युत्तर (एम.ए. / एम.कॉम.) अभ्यासक्रमासाठी किमान कालावधी हा दोन (०२) वर्षाचा असून अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीचा कमाल कालावधी हा चार (०४) वर्षाचा आहे. |
| ७ | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी किमान प्रवेश स्तर अर्हता काय आहे ? | • बी.ए. : HSC (कला / वाणिज्य / विज्ञान)<br>• बी.कॉम. : HSC (वाणिज्य / विज्ञान)<br>• एम.ए. : युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>• एम.कॉम. : युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेसंबंधी पदवी<br>• पदव्युत्तर पदविका : युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>• प्रमाणपत्र अभ्यासक्रम: HSC (कला / वाणिज्य / विज्ञान) |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न</th><th>उत्तरे</th></tr>
<tr><td>८</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठीचे शैक्षणिक शुल्क किती आहे?</td><td>
<table>
<tr><th>Sr.</th><th>Level</th><th>Fresher</th><th>other board</th><th>Category Students</th></tr>
<tr><td>1</td><td>B.A. I / B.Com. I</td><td>6030/-</td><td>6330/-</td><td>1800/-</td></tr>
<tr><td>2</td><td>B.A.II / B.Com. II</td><td>5730/-</td><td>6320/-</td><td>1800/- / 2400/- (other Uni)</td></tr>
<tr><td>3</td><td>B.A. III/ B.Com. III</td><td>6030/-</td><td>-</td><td>2100/-</td></tr>
<tr><td>4</td><td>M.A. I/ M.Com. I</td><td>8220/-</td><td>8520/-</td><td>2350/-</td></tr>
<tr><td>5</td><td>M.A. II / M.Com. II</td><td>8220/-</td><td>-</td><td>2650/-</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>९</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेताना आवश्यक कागदपत्रांची यादी</td><td>10th Marksheet, 12th , Marksheet, Leaving Certificate/ Transfer Certificate / Migration Certificate, Caste Certificate (if applicable), Photograph, Aadhar Card, Degree Marksheet (for Post-Graduation Courses)</td></tr>
<tr><td>१०</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध असलेल्या स्वयंअध्ययन साहित्याच्या उपलब्धतेबद्दल माहिती द्या.</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध असलेले स्वयंअध्ययन साहित्य विद्यार्थिनींना छापील स्वरूपात दूरस्थ शिक्षण केंद्रामार्फत उपलब्ध करून दिले जाते तसेच ऑनलाईन ई-स्वरूपातील स्वयंअध्ययन साहित्य https://www.sndtonline.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.</td></tr>
<tr><td>११</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्राचे विविध अभ्यासक्रमांसाठी स्वयंअध्ययन साहित्य कोणत्या भाषेत उपलब्ध आहे ?</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध असलेले स्वयंअध्ययन साहित्य हे विषयानुरूप आणि वर्गानुरूप मराठी आणि इंग्रजी या दोन भाषेत उपलब्ध आहेत.</td></tr>
<tr><td>१२</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी परीक्षा पद्धती कशाप्रकारची असते? परीक्षेचे भाषा माध्यम कोणते असते?</td><td>UG /PG : अंतिम सत्र परीक्षा (75 marks per paper)<br>परीक्षेचे भाषा माध्यम<br>बी.ए. /एम.ए. : मराठी / इंग्रजी / हिंदी<br>बी.कॉम. / एम. कॉम. : इंग्रजी</td></tr>
<tr><td>१३</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कोणकोणत्या अभ्यासक्रमांसाठी स्वाध्याय (Assignments) आहेत व त्या किती गुणांसाठी आहेत?</td><td>• बी.ए. भाग १ / भाग २ / भाग ३ : १२ पेपर (प्रत्येकी २५ गुण )<br>• बी. कॉम. भाग १ / भाग २ / भाग ३ : १२ पेपर (प्रत्येकी २५ गुण )<br>• एम. ए. भाग १ / भाग २ : १० पेपर (प्रत्येकी २५ गुण )<br>• एम. कॉम. भाग १ / भाग २ : १० पेपर (प्रत्येकी २५ गुण )</td></tr>
<tr><td>१४</td><td>दूरस्थ शिक्षण केंद्राची अंतिम सत्र परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किमान किती गुणांची आवश्यकता आहे.</td><td>• दूरस्थ शिक्षण केंद्राची अंतिम सत्र परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयाच्या बहिस्थ लेखी परीक्षा (External Theory Exam) मध्ये ७५ गुणांपैकी किमान २६ गुण तर अंतर्गत परीक्षेमध्ये २५ गुणांपैकी किमान ०९ गुण प्राप्त करणे अनिवार्य आहे.</td></tr>
<tr><td>१५</td><td>स्वाध्याय (Internal Assignments) ची पूर्तता कशा पद्धतीने करावयाची आहे ?</td><td>• स्वाध्याय प्रश्न (assignment questions) हे स्वयंअध्ययन साहित्यामध्ये नमूद केलेले आहेत तसेच विषय निहाय स्वाध्याय प्रश्न दूरस्थ शिक्षण केंद्राच्या https://www.sndtonline.in/या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.<br>• अभ्यासकेंद्रामध्ये प्रवेशित विदयार्थीनीनी सर्व विषयांचे स्वाध्याय प्रश्न अभ्यास केंद्रामध्ये जमा करणे अपेक्षित आहे. अभ्यासकेंद्राने सर्व विद्यार्थ्यांचे स्वाध्याय प्रश्न त्यांच्यामार्फतच दूरस्थ शिक्षण केंद्राला अग्रेषित करणे आवश्यक आहे.<br>• विद्यार्थिनी आपले स्वाध्याय प्रश्न ऑनलाईन अथवा ऑफलाईन माध्यमातून दूरस्थ शिक्षण केंद्रास सादर करू शकतात.</td></tr>
</table>

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
| --- | --- | --- |
| १६ | स्वाध्याय (Internal Assignments) ची पूर्तता करण्याबाबतची माहिती कोणत्या माध्यमातून प्राप्त होते. | स्वाध्याय प्रश्न (Internal Assignments) सादर करण्याबाबतच्या कालावधीचे परिपत्रक दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अधिकृत संकेत स्थळावर जारी करण्यात येईल. तसेच विद्यार्थिनींच्या प्रवेश अर्जामध्ये नमूद करण्यात आलेल्या ई-मेल आयडीवर स्वाध्याय प्रश्न (Internal Assignments) सादर करण्याबाबतच्या कालावधीचे परिपत्रक पाठविण्यात येईल. |
| १७ | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये प्रवेशित विद्यार्थिनींना शैक्षणिक मार्गदर्शन मिळते का ? | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये प्रवेशित विद्यार्थिनींसाठी वर्ग निहाय आणि विषय निहाय संपर्क सत्र (Contact Sessions / Lectures) घेतले जातात. |
| १८ | दूरस्थ शिक्षण केंद्रातील विद्यार्थिनींच्या गुणपत्रिकेची नक्कल प्रत प्राप्त करण्याची प्रक्रिया कशी आहे ? | **बी.ए. भाग १ आणि बी.कॉम. भाग १** संबधित परीक्षेच्या गुणपत्रिकेची नक्कल प्रत प्राप्त करण्यासाठी विद्यार्थिनींना खालील कागदपत्रांची पूर्तता **संचालक, दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ** येथे करावी लागेल.<br>• गुणपत्रिकेची नक्कल प्राप्त करण्यासाठीचा अर्ज<br>• अर्जासोबत गुणपत्रिकेची स्पष्ट व सुवाच्य छायांकित प्रत<br>• संबधित वर्गाचे शैक्षणिक शुल्क अदा केले असल्याचा पुरावा म्हणून शैक्षणिक शुल्काच्या पावतीची छायांकित प्रत<br>• गुणपत्रिकेची नक्कल प्रत प्राप्त करण्यासाठीचे शुल्क : रू. १५०/- प्रति गुणपत्रिका<br>• "The Registrar, SNDT Women's University, Mumbai", नावाने धनाकर्ष (Demand Draft)<br>• गुणपत्रिका टपालाने हवी असल्यास अतिरिक्त रू. ५०/- शुल्क<br>• गुणपत्रिका हरवली असल्याचे ( "loss of original marksheet") रुपये १०० च्या स्टॅम्पपेपर वर प्रतिज्ञापत्र<br>• सर्व साधारण कालावधी : १५ दिवस |
| १९ | दूरस्थ शिक्षण केंद्रातील विद्यार्थिनींच्या गुणपत्रिकेची नक्कल प्रत प्राप्त करण्याची प्रक्रिया कशी आहे ? | **बी.ए. भाग २ / ३, बी.कॉम. भाग २/३, एम.ए. भाग १/२ आणि एम.कॉम. भाग १/२** संबधित परीक्षेच्या गुणपत्रिकेची नक्कल प्रत प्राप्त करण्यासाठी विद्यार्थिनींना खालील कागदपत्रांची पूर्तता **संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ** येथे करावी लागेल.<br>• गुणपत्रिकेची नक्कल प्राप्त करण्यासाठीचा अर्ज<br>• अर्जासोबत गुणपत्रिकेची स्पष्ट व सुवाच्य छायांकित प्रत<br>• संबधित वर्गाचे शैक्षणिक शुल्क अदा केले असल्याचा पुरावा म्हणून शैक्षणिक शुल्काच्या पावतीची छायांकित प्रत<br>• गुणपत्रिकेची नक्कल प्रत प्राप्त करण्यासाठीचे शुल्क : रू. १५०/- प्रति गुणपत्रिका<br>• "The Registrar, SNDT Women's University, Mumbai", नावाने धनाकर्ष (Demand Draft)<br>• गुणपत्रिका टपालाने हवी असल्यास अतिरिक्त रू. ५०/- शुल्क<br>• गुणपत्रिका हरवली असल्याचे ( "loss of original marksheet") रुपये १०० च्या स्टॅम्पपेपर वर प्रतिज्ञापत्र<br>• सर्व साधारण कालावधी : १५ दिवस |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| २० | दूरस्थ शिक्षण केंद्रातील विद्यार्थिनींच्या पदवी / पदविका प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करण्याची प्रक्रिया कशी आहे ? | पदवी / पदविका प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विद्यार्थिनींना खालील कागदपत्रांची पूर्तता **संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ** येथे करावी लागेल.<br>• पदवी / पदविका प्रमाणपत्र शुल्क : **रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र)**<br>• पदवीदान (दीक्षांत समारंभ) नंतर प्रत्येक दोन वर्षांसाठी विलंब शुल्क : **रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र)**<br>• "The Registrar, SNDT Women's University, Mumbai", या नावाने धनाकर्ष (Demand Draft)<br>• पदवी / पदविका प्रमाणपत्र टपालाने हवे असल्यास अतिरिक्त शुल्क रू. ५०/- (रुपये पन्नास मात्र)<br>• संबधित वर्गाचे शैक्षणिक शुल्क अदा केले असल्याचा पुरावा म्हणून शैक्षणिक शुल्काच्या पावतीची छायांकित प्रत<br>• अंतिम वर्गाच्या निकालाची छायांकित प्रत<br>• सर्वसाधारण कालावधी : १५ दिवस |
| २१ | दूरस्थ शिक्षण केंद्रातील Transfer Certificate प्राप्त करण्याची प्रक्रिया कशी आहे ? | दूरस्थ शिक्षण केंद्रातील Transfer Certificate प्राप्त करण्यासाठी विद्यार्थिनींना खालील कागदपत्रांची पूर्तता **संचालक, दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ** येथे करावी लागेल.<br>• Transfer Certificate प्राप्त करण्यासाठीचा अर्ज<br>• अर्जासोबत सर्व गुणपत्रिकेची स्पष्ट व सुवाच्य छायांकित प्रत<br>• संबधित वर्गाचे शैक्षणिक शुल्क अदा केले असल्याचा पुरावा म्हणून शैक्षणिक शुल्काच्या पावतीची छायांकित प्रत<br>• Transfer Certificate प्राप्त करण्यासाठीचे शुल्क : रू. १५०/- रोखीने किंवा "The Registrar, SNDT Women's University, Mumbai", नावाने धनाकर्ष (Demand Draft) किंवा<br>• Transfer Certificate टपालाने हवे असल्यास अतिरिक्त रू. ५०/- शुल्क<br>• सर्व साधारण कालावधी : १५ दिवस |
| २२ | दूरस्थ शिक्षण केंद्रातील Migration Certificate प्राप्त करण्याची प्रक्रिया कशी आहे ? | दूरस्थ शिक्षण केंद्रातील Migration Certificate प्राप्त करण्यासाठी विद्यार्थिनींना खालील कागदपत्रांची पूर्तता **संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ** येथे करावी लागेल.<br>• Migration Certificate प्राप्त करण्यासाठीचा अर्ज<br>• अर्जासोबत सर्व गुणपत्रिकांची स्पष्ट व सुवाच्य छायांकित प्रत<br>• संबधित वर्गाचे शैक्षणिक शुल्क अदा केले असल्याचा पुरावा म्हणून शैक्षणिक शुल्काच्या पावतीची छायांकित प्रत<br>• Migration Certificate प्राप्त करण्यासाठीचे शुल्क : रू. २५५ /- रोखीने किंवा "The Registrar, SNDT Women's University, Mumbai", नावाने धनाकर्ष (Demand Draft)<br>• Migration Certificate टपालाने हवे असल्यास अतिरिक्त रू. ५०/- शुल्क<br>• सर्व साधारण कालावधी : १५ दिवस |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| २३ | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाशी संपर्कासाठी फोन व ईमेल आयडी | Tel : 0-22-26607758/ 0-22-26608193<br>Email ID: studentsupport@cde.sndt.ac.in<br>Website : www.cde.sndt.ac.in<br>: www.sndt.ac.in |
| २४ | **विशेष सूचना** | • तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार त्या त्या कारणांसाठी ठरवून दिलेल्या दूरध्वनी क्रमांकावरच / ई-मेलवर संपर्क साधावा.<br>• ई-मेल पाठविताना प्रवेश अर्जामध्ये नमूद करण्यात आलेलाच ई-मेल आयडी वापरण्यात यावा.ई-मेल पाठवताना आपली संपूर्ण माहिती आणि शंका / अडचण तपशीलवार लिहावी. त्यामध्ये आपला मोबाईल क्रमांक नमूद करावा म्हणजे आवश्यकतेनुसार आम्हाला आपल्याशी संपर्क साधता येईल.<br>• आपल्याला काही तांत्रिक अडचण / समस्या असेल तर त्याचा स्क्रीन शॉट घेऊन तो ई-मेल सोबत पाठवावा म्हणजे आपल्या अडचणीचे नेमके स्वरूप समजू शकेल.<br>• ई-मेल पाठविल्यानंतर आपली अडचण तपासून ती सोडविण्यासाठी आम्हाला दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागू शकतो. आपल्या ई-मेलचे उत्तर ई-मेलवरच पाठविण्यात येईल.<br>• ई-मेल /मोबाईलवरून विद्यापीठाशी संपर्क साधताना आपले म्हणणे नेमकेपणे, मुद्देसूद आणि सौम्य भाषेत मांडावे.<br>• विद्यापीठ कार्यालयास महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी तसेच प्रत्येक रविवारी आणि शासकीय रजांच्या दिवशी सुट्टी असते. आपण कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते १:०० आणि दुपारी २:०० ते ५.१५ या वेळेत संपर्क साधावा.<br>• आपल्या शंका / अडचणींबाबत विद्यापीठाशी संपर्क साधण्याअगोदर आपण संभाव्य प्रश्नांची उत्तरे वाचावीत. आपल्या अनेक शंकांचे निरसन त्याद्वारे होऊ शकेल. |

# Frequently Asked Questions for Scholarship

## (शिष्यवृत्ती संदर्भात तुमच्या संभाव्य प्रश्नांची उत्तरे)

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेताना राखीव प्रवर्गातील विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त होतो का? | होय, दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेताना राखीव प्रवर्गातील विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त होतो. दूरस्थ शिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या राखीव प्रवर्गातील (SC/SBC/OBC/VJNT) विद्यार्थिनींना भारत सरकारच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त होतो. |
| २ | शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त होण्यासाठी शासनामार्फत निर्धारित उत्पन्नाची मर्यादा किती आहे. | • अनुसुचित जाती **(SC) वार्षिक उत्पन्न मर्यादा २.५० लाखापर्यंत**<br>• इतर मागास जाती, विमुक्त व भटक्या जमाती, आणि विशेष मागास प्रवर्ग **(OBC/VJNT/SBC) वार्षिक उत्पन्न मर्यादा दीड** (१.५) **लाखापर्यंत.** |
| ३ | भारत सरकारच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त करण्यासाठी आवश्यक / अनिवार्य प्रक्रियेची माहिती द्या. | दूरस्थ शिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या राखीव प्रवर्गातील (SC/SBC/OBC/VJNT) विद्यार्थिनींना भारत सरकारच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त करण्यासाठी https://mahadbtmahait.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर शासनामार्फत विहित मुदतीत व शासनामार्फत निर्धारित कागदपत्र एव दस्तऐवज यांच्यासहित ऑनलाईन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. |
| ४ | भारत सरकारच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत निर्धारित कागदपत्र एव दस्तऐवज याची माहिती द्या. | • 10 वी (SSC), 12 वी (HSC) गुणपत्रिका व मागील वर्षाच्या शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे (पदवी असेल तर पदवी प्रमाण पत्र)<br>• अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल सर्टिफिकेट), जातीचा दाखला<br>• उत्पनाचा दाखला तहसीलदार यांनीच दिलेला असावा, उत्पन्नासाठी Form no.16 गृहीत धरला जाणार नाही.<br>• शैक्षणिक वर्षात खंड (Gap) असल्यास शै क्षणिक खंड शपथपत्र (Affidavit, on Rs. 100 Stamp paper) सादर करावे.<br>• लग्न झाल्या कारणाने नाव बदल असल्यास, विवाह प्रमाणपत्र किंवा गॅझेट प्रमाण पत्र जोडावे त्याचबरोबर पतीच्या उत्पना चा दाखला सादर करणे अनिवार्य आहे.<br>• आधार कार्ड, रेशन कार्ड छायांकित व स्वसांक्षाकित प्रत<br>• आधार कार्डला मोबाईल क्रमांक संलग्न असणे आवश्यक<br>• राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये खाते असणे अनिवार्य व बँकेच्या खात्यास आधारकार्ड संलग्न असणे आवश्यक |
| ५ | शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी सहाय्य हवे असल्यास संपर्क | • Tel : 0-22-26607758/ 0-22-26608193<br>• ई-मेल आयडी : socialwelfare@cde.sndt.ac.in |